मिरा भाईंदर महानगरपालिका

आस्थापना विभाग

मा.महासभा दि. 16 / 10 /2026

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" पकरण 2 नियम "के" अन्वये

(गोषवारा)

प्रकरण क्र. 112 :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त दरवर्षीप्रमाणे सानुग्रह अनुदान देणे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान/बोनस देण्याबाबत राज्य शासनाचे धोरण नाही. मात्र यापुर्वी राज्य शासन, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अन्वये मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक, महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचेसमवेत दि.31/10/2002 रोजी बैठक झालेली होती. सदर बैठकीत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना पुढील प्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय झालेला आहे.

"महानगरपालिकेने कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे संदर्भात आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर घ्यावा. राज्यशासन महानगरपालिकेला कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी कुठल्याही प्रकारचे अनुदान देत नसल्याने सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्यशासनाची पुर्व परवानगी घेण्याची गरज नाही. मात्र सानुग्रह अनुदान देतांना प्रशासन व मा. महासभा यांच्यात वाद निर्माण झाल्यास व त्यानंतर हा वाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविला गेल्यास शासन अशा प्रकरणी उचित निर्णय घेईल."

वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दि.31/10/2002 रोजी महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व आयुक्त, सर्व महानगरपालिका यांच्या झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. जीईएन-1017/प्र.क्र.-267/नवि-24, दि.27/11/2002 अंतर्गत उपरोक्त नमुद शासनाचे निर्देश पाहता महापालिकेने आपल्या स्तरावर सानुग्रह अनुदान देणेबाबत निर्णय घेणे उचित आहे. गेल्यावर्षी मा.प्रशासकीय ठराव क्र.259, दि.14/10/2025 अन्वये महानगरपालिका प्रतिनियुक्ती अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील अधिकारी व कर्मचारी, ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी, सेवाकरारपध्दतीने नेमणूक केलेले सेवानिवृत्त अधिकारी यांना सन 2024-25 या वर्षाकरीता खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदान मंजूर करुन प्रदान करण्यात आलेले आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचा तपशिल	कार्यरत अधिकारी/ कर्मचारी	सन 2024-25 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये	सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम
1.	महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील कर्मचारी वर्ग	1480	25,953/-	3,84,10,440/-

2.	संगणक चालक/लघुलेखक	13	19,984/-	2,59,792/-
3.	बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी)	02	11,420/-	22,840/-
4.	कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी)	136	14,923/-	20,29,528/-
5.	लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी)	220	4,078/-	8,97,160/-
6.	सहा.विधी अधिकारी	03	16,415/-	49,245/-
7.	वैद्यकीय आरोग्य विभागातील ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी	35	16,415/-	5,74,525/-
8.	राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान	05	11,420/-	57,100/-
9.	स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक	04	9,863/-	39,452/-
10.	पी.एम.ए.वाय. योजनेतील कर्मचारी	03	11,420/-	34,260/-
11.	सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी व कुस्ती मार्गदर्शक, शिक्षण सेवक	67	7,137/-	478179
12.	क्रिडा शिक्षक	06	16,415/-	98490
13.	क्षयरोग कर्मचारी	27	14,923/-	402921
14.	सेवानिवृत्त अधिकारी	07	25,953/-	1,81,671/-
	एकुण	2008		4,35,35,603/-

शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचा तपशिल	शिक्षक वर्गाची संख्या	सन 2024-25 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये	सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम
1.	मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी	149	25,953/-	38,66,997/-
2.	सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी	20	19,984/-	3,99,680/-
3.	ठोक मानधनावरील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक	38	12,600/-	4,78,800/-
	एकुण	207		47,45,477/-

वरीलप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी, शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक कर्मचारी व अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना मागील वर्षी सानुग्रह अनुदान वाटपासाठी एकुण रु.4,60,88,312/- इतके सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र.4 व 5 मध्ये विभागानी केलेल्या मागणीनुसार कर्मचाऱ्यांना, मनपा आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी तसेच सेवानिवृत्ती अधिकारी व ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी दि.31/03/2026 पर्यंत कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना मागील सन 2025-26 मध्ये मंजूर झालेल्या अनुदान रक्कमे प्रमाणे यावर्षी ही अनुदान प्रदान केल्यास होणारा अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे आहे.

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचा तपशिल	कार्यरत अधिकारी/ कर्मचारी	सन 2025-26 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये	सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम
1.	महापालिका आस्थापनेवरील प्रतिनियुक्ती वरील अधिकारी, वर्ग-01 ते वर्ग-04 संवर्गातील कर्मचारी वर्ग	1428	25,953/-	3,70,60,884/-
2.	संगणक चालक/लघुलेखक	13	19,984/-	2,59,792/-
3.	बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी)	02	11,420/-	22,840/-
4.	कुष्ठरोग तंत्रज्ञ, आय.सी.टी.सी. व मलेरीया पर्यवेक्षक, आर.बी.एस.के. पथक, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (ठोक मानधनावरील कर्मचारी)	172	14,923/-	25,66,756/-
5.	लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी)	329	4,078/-	13,41,662/-
6.	सहा.विधी अधिकारी	02	16,415/-	32,830/-
7.	वैद्यकीय आरोग्य विभागातील ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी	28	16,415/-	4,59,620/-
8.	राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान	05	11,420/-	57,100/-
9.	स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक	04	9,863/-	39,452/-
10.	सर्व शिक्षा अभियान अंतर्गत काळजी वाहक कर्मचारी व कुस्ती मार्गदर्शक, शिक्षण सेवक	62	7,137/-	4,42,494/-
11.	क्रिडा शिक्षक	05	16,415/-	82,075/-
12.	क्षयरोग कर्मचारी	24	14,923/-	3,58,152/-
13.	सेवानिवृत्त अधिकारी	06	25,953/-	1,55,718/-
	एकुण	2080		4,28,79,375/-

शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्गाकरीता

अ.क्र.	कर्मचाऱ्यांचा तपशिल	शिक्षक वर्गाची संख्या	सन 2025-26 या वर्षाकरीता मंजुर सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये	सानुग्रह अनुदानापोटी एकुण खर्चास मंजुरी दिलेली रक्कम
1.	मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग व सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी	151	25,953/-	39,18,903/-
2.	सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचारी/शालेय पोषण आहार अंतर्गत कर्मचारी	10	19,984/-	1,99,840/-
3.	ठोक मानधनावरील प्राथमिक व माध्यमिक शिक्षक	35	12,600/-	4,41,000/-
	एकुण	**196**		45,59,743/-

वरील प्रमाणे महानगरपालिका प्रतिनियुक्ती अधिकारी, आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी व अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना तसेच सेवाकरारपध्दतीने घेण्यात आलेले सेवानिवृत्त अधिकारी, ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी रु.4,74,39,118/- (अक्षरी रु.चार कोटी चौऱ्याहत्तर लाख एकोणचाळीस हजार एकशे अठरा मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. आणि या वर्षीच्या मंजुर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु.5.00 कोटी इतकी तरतुद आहे.

तरी महानगरपालिका प्रतिनियुक्ती अधिकारी, आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना, शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी व अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना तसेच सेवाकरारपध्दतीने घेण्यात आलेले सेवानिवृत्त अधिकारी, ठोक मानधनावरील अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षीप्रमाणे यावर्षी ही सानुग्रह अनुदान देणेबाबतच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेकरीता मा.महासभेपुढे गोषवारा ठेवणेस शिफारस आहे.

(प्रणाली घोंगे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १४/१० /२०२६ वेळ सायं.०४.४०
रजिस्टर नोंद अ. क्र. ८८ वर्ष २६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. १६.१०.२०२६.

// गोषवारा //

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" मधील प्रकारण दोन (१) (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्र. (१९३) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पू.) हिंदु स्मशानभुमी येथे एल.पी.जी शवदाहिनी व लाकडी शवदाहिनी करीता नविन एअर एक्झॉस्ट सिस्टीम बसविणे.

उपरोक्त विषयानूसार मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पू.) हिंदु स्मशानभुमी येथे एल.पी.जी शवदाहिनी व लाकडी शवदाहिनी करीता यापुर्वी बसविण्यात आलेली यंत्रणा पुर्णपणे जीर्ण अवस्थेत झालेली आहे. सदर ठिकाणी जाफरी खाडी परिसर असल्याने सदरची यंत्रणा नादुरुस्त झालेली आहे. सदरचा परिसर रहिवाशी व्याप्त असल्याने प्रेत दहन करतेवेळी सदरचा दुर आजुबाजुच्या परिसरामध्ये पसरत आहे. त्याकरीता नविन एअर एक्झॉस्ट सिस्टीम बसविणे आवश्यक आहे. सदर कामासाठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

कामाचा खर्च :

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च
1)	मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पू.) हिंदु स्मशानभुमी येथे एल.पी.जी शवदाहिनी व लाकडी शवदाहिनी करीता नविन एअर एक्झॉस्ट सिस्टीम बसविणे	रु.७६,४३,५१४/-

वरील काम हे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधीतुन करावयाचे असुन खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

दिपक खांबित
प्र. शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

PC-03/2026-27/PJ/गोषवारा/-03

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १६.१०.२०२५

// गोषवारा //

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन नियम 1 (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्रमांक.(१९८ **)** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग क्र.24 मधील उत्तन सर्व्हे क्र.201 येथे श्वान निवारा केंद्र बांधणेबाबत.

मा. सर्वोच्च न्यायालय Sue Moto Petition (CIVIL NO (S) 5/2025) मधील दि.07/11/2025 रोजीच्या आदेशानूसार शहरातील भटक्या श्वानांच्यासाठी निवारा उभारावयाचा आहे. मौजे उत्तन सर्व्हे क्र.201 या शासकीय जागेमधील नव्याने तयार करण्यात येत असलेल्या विकास योजनेत आरक्षण क्र.45 (म्युनिसिपल पर्पज) या जागेपैकी 2000 चौ.मीटर जागा श्वान निवारा केंद्र बांधण्यासाठी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर जागा महानरगपालिकेस हस्तांतरणाची प्रक्रीया सुरु आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाकडील / शासनाच्या मार्गदर्शनानूसार सदर जागेत श्वान निवारा केंद्र बांधण्यासाठी रु.10.18 कोटी रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सन 2026-27 या वर्षातील आर्थिक तरतूद व सन 2027-28 या वर्षात आर्थिक तरतूद करुन सदर काम करावयाचे आहे. तरी सदर प्रस्तावाच्या अनुशंगाने खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-6/2026-27/DK/MG-06

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१६/ १०/२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र (११५) :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन (१) के अन्वये प्रस्ताव केंद्र पुरकृत अमृत २.० अभियानातंर्गत प्रोत्साहन निधी (Reforms Incentive) मधून **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील IoT आधारित स्मार्ट NRW (Non-Revenue Water) व्यवस्थापन व भूमिगत पाणीपुरवठा वाहिनी गळती शोध प्रणालीचे डिझाईन, पुरवठा, स्थापना, चाचणी, कार्यान्वित करणे व वार्षिक व्यापक देखभाल (AMC) करणे या कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मंजूरी मिळणेबाबत.** (E-3469166)

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेस नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण प्रकल्पांच्या परिणामकारक अंमलबजाावणीसाठी पहिल्या (पाणी पुरवठा) टप्यासाठी रु.10 कोटी व दुसऱ्या (मलनि:सारण) टप्यासाठी रु.10 कोटी असा एकूण दोन्ही टप्यासाठीचा रु.20 कोटीचा प्रोत्साहन निधी (Reforms Incentive) मंजूर करण्यात आला आहे.

सदरच्या निधीमधून केंद्र शासनाच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, अमृत (AMRUT) विभाग यांनी सदरचा निधी हा वापरणेबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत.

केंद्र शासनाच्या सुचनेनूसार केंद्र पुरकृत अमृत 2.0 अभियानातंर्गत प्रोत्साहन निधी (Reforms Incentive) मधून मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील IoT आधारित स्मार्ट NRW (Non-Revenue Water) व्यवस्थापन व भूमिगत पाणीपुरवठा वाहिनी गळती शोध प्रणालीचे डिझाईन, पुरवठा, स्थापना, चाचणी, कार्यान्वित करणे व वार्षिक व्यापक देखभाल (AMC) करणे कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेकामी नियुक्त केलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार. मे. फोरस्ट्रेस इन्फ्राकॉन लिमिटेड, यांनी सविस्तर प्रकल्प अहवाल त्यांच्या दि.10/09/2026 रोजीच्या पत्रान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील IoT आधारित स्मार्ट NRW (Non-Revenue Water) व्यवस्थापन व भूमिगत पाणीपुरवठा वाहिनी गळती शोध प्रणालीचे डिझाईन, पुरवठा, स्थापना, चाचणी, कार्यान्वित करणे व वार्षिक व्यापक देखभाल (AMC) करणे या कामासाठीचा रु. 10.04 कोटी किमंतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. सदरच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

1	Digital Ground Microphone & Listening Probe
2	Advanced Leak Noise Correlator
3	Fixed Network Leak Noise Logger (IoT)
4	4-Path Ultrasonic Bulk Flow Meter (Insertion / Clamp-on or Spool-piece)
5	Smart Domestic Water Meter with Integrated Pressure Sensor
6	Precision Multi-Frequency Pipe & Cable Locator
7	Cloud & Software Platform for NRW Management & Leak Detection
8	Open-Channel Doppler Flow Meter for Drainage Overflow Audit
9	Operation & Maintenance support &Training (1 Year)
10	Leak Detection Van with Mobile Work station.

उपरोक्त प्रमाणे विषयांकीत कामाच्या सविस्तर प्रकल्पास मा.महासभेची मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि. / /२०२६

// गोषवारा //

प्रकरण क्र (११६) :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' मधील प्रकरण दोन (१) के अन्वये प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५ द.ल.लि. क्षमतेच्या सांडपाण्यावरील पुर्नप्रकिया केंद्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत. (E- ३४०५८३७)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भुयारी गटार योजनेअंतर्गत केंद्र शासनाच्या लागू मार्गदर्शक तत्त्वांनुसार ५ द.ल.लि. क्षमतेचे सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्र (Tertiary Treatment Plant) उभारण्यात आलेले आहे. सदर केंद्रामध्ये सांडपाण्यावर आवश्यक प्रक्रिया करून प्राप्त होणाऱ्या पुनर्वापरयोग्य पाण्याचा उपयोग शहरातील बांधकामासाठी, महानगरपालिकेच्या विविध विकासकामांसाठी तसेच मैदाने, दुभाजके व गार्डन क्षेत्रास पाणी देण्यासाठी करण्यात येत आहे. सदर सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्रामध्ये विविध प्रकारची यांत्रिक, विद्युत, इलेक्ट्रो-मेकॅनिकल, प्रक्रिया संबंधित यंत्रसामग्री तसेच विविध नागरी बांधकामे (Civil Structures) कार्यरत आहेत. केंद्राची अखंडित व कार्यक्षम सेवा सुरू ठेवण्यासाठी सदर यंत्रसामग्रीची नियमित प्रतिबंधात्मक देखभाल (Preventive Maintenance), दुरुस्ती (Repair), आवश्यक सुटे भाग बदलणे (Replacement of Spares), आपत्कालीन दुरुस्ती (Breakdown/ Emergency Maintenance) तसेच आवश्यक नागरी दुरुस्ती व देखभाल (Civil Repair & Maintenance) करणे अत्यावश्यक आहे.

यापूर्वी सदर केंद्राच्या देखभाल-दुरुस्तीच्या निविदेचा वार्षिक अंदाजित खर्च रू.४५,१६,५१२/- इतका असून कामामध्ये दुरुस्तीकरिता किरकोळ दुरुस्ती (Minor Repair) चा समावेश करण्यात आलेला होता. तथापि, केंद्रातील यंत्रसामग्री, इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रो-मेकॅनिकल उपकरणे तसेच विविध नागरी बांधकामांमध्ये कालांतराने मोठ्या स्वरूपाची दुरुस्ती अथवा spare parts बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास सदर कामे विद्यमान किरकोळ दुरुस्तीच्या कामात करता येत नसल्याने अशा कामांसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणे आवश्यक ठरत होते. त्यामुळे आवश्यक दुरुस्ती वेळेत न झाल्यास संबंधित यंत्रसामग्री अथवा संरचनेचा कार्यक्षम वापर बाधित होऊन सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्राच्या कार्यक्षमतेवर तसेच पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते.

त्याअनुषंगाने, सदर ५ MLD सांडपाणी पुनर्प्रक्रिया केंद्रातील सर्व संबंधित यांत्रिक, विद्युत, इलेक्ट्रो-मेकॅनिकल, प्रक्रिया यंत्रसामग्री व नागरी बांधकामांची नियमित प्रतिबंधात्मक देखभाल, किरकोळ व मोठ्या स्वरूपाच्या दुरुस्ती, आवश्यक सुटे भाग/घटक बदलणे, इत्यादी कामे सदर अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. सदर प्रस्तावित कामामुळे यंत्रसामग्री अथवा नागरी संरचनेमध्ये बिघाड/दुरुस्तीची आवश्यकता निर्माण झाल्यास तातडीने कार्यवाही करणे शक्य होऊन केंद्राचा अनावश्यक बंद कालावधी कमी होईल, तसेच पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याचा सातत्यपूर्ण, सुरक्षित व कार्यक्षम पुनर्वापर सुनिश्चित करता येईल.

त्यानुसार खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित खर्च (जी.एस.टी. सहित)
१.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ५ द.ल.लि. क्षमतेच्या सांडपाण्यावरील पुर्नप्रकिया केंद्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.	रु.८०,८२,०२७/-

तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १५ / १० /२०२६

// गोषवारा //

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" प्रकरण २ नियम १ (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्रमांक (११७) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान लिचेट ट्रीटमेंट प्लांट (LTP) ची मुदत संपुष्टात आल्याने नवीन (LTP) Build-Own-Operate (BOO) तत्त्वावर उभारणे कामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेबाबत...

Proposed for the supply installation & Testing of ५० cu.mtr advance RO membrane system for leachate Effluent recycle with operation and Maintenance on BOO basis and disposal of rejects to landfill in M.B.M.C Area. याकामी जा.क्र.मनपा/साबां/कार्या/१६१/२०२१-२२ दि.२६/०७/२०२१ अन्वये मे. राठोड असोसिएट्स जेव्ही मे. मोव्ही इकोसर्व्ह प्रा. लि. यांना कार्यादेश देण्यात आलेला होता.

मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.०४ दि.०५/०४/२०२१ अन्वये सदर कामाची मुदत ५ वर्षे दि.२६/०७/२०२१ ते दि.२५/०७/२०२६ रोजी संपुष्टात आलेली आहे.

परंतु मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे उत्तन येथील घनकचरा प्रकल्प जागेत १३ लाख क्युबिक मिटर पर्यंतचा घनकचरा जमा आहे. सदर घनकचऱ्यातुन दररोज अंदाजे ५०००० ते ७०००० लिटर लिचेट निघत असल्याने लिचेटवर प्रक्रिया करण्याचे काम अत्यावश्यक असल्याने सुरु ठेवण्यात आलेले आहे. त्याकरीता लिचेट ट्रीटमेंट प्लांट (LTP) ची मुदत संपुष्टात आल्याने नवीन (LTP) Build-Own-Transfer (BOT) तत्त्वावर उभारणे कामाची नव्याने निविदा मागविण्यापर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता देणेस विनंती आहे, तसेच सदर कामाची नव्याने निविदा मागविण्यास मान्यता मिळणेस शिफारस आहे.

मा.स्थायी समिती ठराव क्र.१०८ दि.०१/१०/२०२६ रोजीच्या पुर्नविनियोजनाव्दारे तरतुद उपलब्ध करण्यात आलेली असुन सदर कामी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये लिचेट प्रक्रिया व इतर कामे या लेखार्शिर्षकाअंतर्गत अंर्थसंकल्पिय तरतुद उपलब्ध आहे.

सदर कामासाठी ५ वर्षाकरीता अंदाजे रू.८,६६,८७,५००/- खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कामासाठी निविदा मागवून दर निश्चित करावयाचे आहेत. सदर कामी होणारा खर्च सन २०२७-२८ या आर्थिक वर्षाच्या "लिचेट प्रक्रिया व इतर कामे" या लेखाशीर्षातून करण्यात येणार आहे.

तरी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान लिचेट ट्रीटमेंट प्लांट (LTP) ची मुदत संपुष्टात आल्याने पाच वर्षीय मुदतीसाठी नवीन (LTP) Build-Own-Operate (BOO) तत्त्वावर उभारणे कामाची नव्याने निविदा मागविणेसाठी रु. ८,६६,८७,५००/- रकमेच्या

खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देणेस तसेच नव्याने निविदा मागवुन कार्यादेश देईपर्यंत होणाऱ्या रु.१,१०,००,०००/- वाढीव खर्चासह रु.२,७६,७२,५००/- सुधारीत खर्चास मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

मा. महासभा / ~~स्थायी समिती सभा~~
गोषवारा प्राप्त दि. १५ / १० / २०२६ वेळ दु. ०१ = ३५ वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ८८ वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१६/ १० /२०२६

// गोषवारा //

: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (एक) (के) अन्वये प्रस्ताव

प्रकरण क्रमांक (११८) मिरारोड (पुर्व) मंजुर विकास योजनेतील कॅन्सर रुग्णालय आरक्षणाच्या जागेवर कॅन्सर रुग्णालय उभारणे कामाच्या खर्चास मान्यता देणे.

मिरारोड (पुर्व) कॅन्सर हॉस्पिटल उभारणेकामी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास" योजनेतंर्गत शासन निर्णय क्र.- मनपा/२०२४/प्र.क्र.६/नवि-१६ दि.१४/०३/२०२४ अन्वये १३४.०० कोटी निधी मंजुर करण्यात आले आहे. प्रकल्प खर्चाचा ७५% हिस्सा राज्य शासनाचा व २५% हिस्सा महानगरपालिकेस करावा लागणार आहे. सदर कामासाठी प्राप्त प्रशासकीय मान्यतेनुसार निविदा प्रक्रिया करुन निविदा मंजुर करण्यात आली होती.

कॅन्सर रुग्णालय बांधकाम करणे कामाचे अंदाजपत्रक सन २०२२-२३ या वर्षाच्या राज्य दरसुचीतील असून कामामध्ये इमारतीचे आर.सी.सी.बांधकाम, इलेक्ट्रीकल कामे एच.बी.ए.सी.प्लंम्बींग इ. स्थापत्य कामे करण्याचा कामांचा समावेश आहे. सदील कामातील भाववाढ कामातील वाढीव कामे करणे, कामाच्या अंदाजपत्रकात Recuring खर्च, कॅन्सर रुग्णालयास लागणारी साधन सामुग्री, Medical Furniture Equipment, मनुष्यबळ इ. बाबींचा अंर्तभाव नाही. कॅन्सर हॉस्पीटल बांधणे व त्या अनुषंगाने अंतर्गत कामे करणे या करीता साधारणता ३ ते ५ वर्षाचा कालावधील लागण्याची शक्यता आहे. सदरील बाब विचारात घेवून कॅन्सर रुगणालयात इमारतीचे बांधकाम करणे (आर.सी.सी., सिव्हील, इलेक्ट्रिकल, एच.वी.ए.सी., प्लंबिंग, मेडीकल गॅस, नर्स कॉल सिस्टीम, इंटेरियर ॲण्ड फिनिशींग) वैद्यकीय साधनसामुग्री (LINAC, MRI, CT Simulator, USG, X-Ray, Cath Lab, २D Echo, Neurology Equipment, Blood Bank Equipment, Dialysis Machine, Ventilators, १५० Motorized Beds, Laparoscopes, Endoscopy Equipment, and Allied Equipment for all departments.), फर्निचर (Patient areas, Office, Pharmacy Storage, MRD etc.), रुग्णालय सुरु करण्याकरीता लागणारा वार्षिक खर्च (Working Capital) (कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, Paramedixs. Admin यांची नेमणुक करणे. त्यांचे वेतन, cost of drugs, स्टेशनरी, Printing Travel, Marketing Expences, रुग्णालय चालविण्याकरीता लागणारा खर्च तसेच मेंटेनन्स खर्च), रुग्णवाहीका (Force Cardiac/Advanced Life Support Ambulance-२Units. Omni Ambulance-४ Units.), सॉफ्टवेअर (Hospital Information Management System with ५ years updates.) इ.बाबी विचारात घेऊन सुधारीत अंदाजपत्रक तयार केले आहे.

राज्य शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार सदर रुग्णालय बांधणेसाठी निविदा प्रक्रिया करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे. सदर कॅन्सर हॉस्पिटल उभारणेकामी एकुण सुधारीत खर्च

रु.३५१,५६,२१,२८७/- एवढा अपेक्षित आहे. कॅन्सर हॉस्पिटलचे बांधकाम करणे, संचालन करणे ही बाब आर्थिकदृष्ट्या खर्चिक आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नाही. त्यामुळे शासनाकडुन १००% निधी उपलब्ध होणे करीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

शासनाकडील कॅन्सर हॉस्पीटल बांधणेसाठी मंजुर झालेला प्रस्ताव पहाता सद्यस्थितीत शासनाने मंजुर केलेल्या निधिच्या मर्यादेत करावी लागणारी कामे ही निविदा प्रक्रिया करुन करणेस तसेच सुधारीत खर्चानुसार लागणारा व उर्वरित निधी प्राप्त झाल्यानुसार वाढीव कामासाठी नविन निविदा प्रकिया करुन कामे करण्यात येतील. तसेच सदर कामाकरीता मनपाच्या अर्थसंकल्पात वेळोवेळी तरतुद करुन सदर कॅन्सर रुग्णालयाचे काम पुर्ण करावे लागेल.

तरी वरील प्रस्तावानुसार कॅन्सर हॉस्पीटलचे मंजुर निधी नुसार करणेस व वाढीव काम होणाऱ्या निधीनुसार भविष्यात उपलब्ध करण्यास तसेच रु.३५१,५६,२१,२८७/-/- रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ नुसार मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.१५/१०/२०२६ वेळ दु. १.३५ वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. ८० वर्ष २०२६-२७

लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-09/VP/2026-27/DK-07